दैनिक

चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी



❊ वर्ष : ०१ ले ❊ | ❊ अंक : ९७ ❊ | ❊ शनिवार ०७ नोव्हेंबर २०२६ ❊ | ❊ जालना ❊ | ❊किंमत : २ रूपये ❊ | ❊पृष्ठे : ४ ❊

◎Volume 01◎ | ◎ Issue 97 ◎ | ◎ Saturday, Date : 07 November 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2 ◎ | ◎Pages 4 ◎

मंत्री असताना जिल्ह्यात ४९ नवीन ३३ केव्ही उपकेंद्रांची उभारणी केल्याची आमदार लोणीकर यांची माहिती

परतूर तालुक्यातील वीज वितरण व्यवस्थेला मिळणार बळ; १० कोटी ५० लाखांच्या निधीतून उपकेंद्रांची क्षमता वाढ!

परतूर : परतूर विधानसभा मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. तालुक्यातील आष्टी, श्रीष्टी आणि वाढोणा येथील ३३ केव्ही वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी ५ एमव्हीए क्षमतेच्या वाढीची कामे पूर्ण करण्यात आली असून, सुमारे १० कोटी ५० लाख रुपये खर्चाच्या या कामांचे लोकार्पण माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

या तीनही उपकेंद्रांच्या क्षमतावाढीमुळे परिसरातील वीज वितरण व्यवस्थेला मोठे बळ मिळणार असून, वाढत्या वीज मागणीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. विशेषतः शेतकरी, व्यावसायिक तसेच घरगुती वीज ग्राहकांना अधिक दर्जेदार, सुरळीत आणि अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. या कामांमध्ये आष्टी येथील ३३ केव्ही उपकेंद्राच्या क्षमतावाढीसाठी ४ कोटी ५० लाख रुपये, सृष्टी येथील उपकेंद्रासाठी २ कोटी ५० लाख रुपये, तर वाढोणा येथील उपकेंद्रासाठी १ कोटी ५० लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण १० कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून तीनही उपकेंद्रांची क्षमता वाढविण्यात आली आहे. यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या मंत्रीपदाच्या कार्यकाळातील वीज वितरण क्षेत्रातील कामांचा आढावा मांडला. आपण मंत्री असताना संपूर्ण जालना जिल्ह्यात तब्बल ४९ नवीन ३३ केव्ही वीज उपकेंद्रांची उभारणी करण्याचे महत्त्वपूर्ण काम केले, असे त्यांनी सांगितले. त्यापूर्वी संपूर्ण जिल्ह्यात केवळ ७९ उपकेंद्रे होती. मात्र, वीज वितरण व्यवस्थेचे जाळे विस्तारण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करून आपण मंत्री असताना नवीन ४९ उपकेंद्रांची उभारणी करण्यात आली. तर जिल्ह्यात त्यावेळी फक्त एक २२० के व्ही उपकेंद्र होते त्याचा विस्तार करत परतूर येथेही २२० के व्ही त्यामुळे जिल्ह्यातील वीजपुरवठा व्यवस्थेला मोठी चालना मिळाली असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील वीजपुरवठा हा शेती, उद्योग, व्यवसाय आणि सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन



जीवनाशी निगडित महत्त्वाचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच शेती आणि व्यावसायिक क्षेत्रातील विजेची मागणीही वाढत आहे. ही बाब लक्षात घेऊन उपकेंद्रांची क्षमता वाढविण्याची कामे हाती घेण्यात आली. आष्टी, सृष्टी आणि वाढोणा येथील क्षमतावाढीमुळे परिसरातील ग्राहकांना याचा थेट लाभ मिळणार असून, वीजपुरवठ्यातील अडचणी कमी होण्यास मदत होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी आमदार लोणीकर यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील पाणीप्रश्नावरही भाष्य केले. वॉटर ग्रीडच्या माध्यमातून मतदारसंघातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू असून, आगामी काळात पाणीटंचाईच्या झळा नागरिकांना जाणवणार नाहीत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच ज्या गावांमध्ये अद्याप वॉटर ग्रीडचे पाणी पोहोचलेले नाही, त्या सर्व गावांपर्यंत पाणी पोहोचविण्याची जबाबदारी आपली असल्याचे स्पष्ट करत, प्रत्येक गावाला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. वीज आणि पाणी या ग्रामीण विकासाच्या दोन महत्त्वाच्या गरजा असून, या दोन्ही क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत, असेही आमदार लोणीकर यांनी यावेळी अधोरेखित केले. तीन महत्त्वपूर्ण वीज उपकेंद्रांच्या क्षमतावाढीच्या लोकार्पणामुळे परतूर तालुक्याच्या वीज वितरण व्यवस्थेला नवी ऊर्जा मिळणार असून, ग्रामीण भागातील वीज ग्राहकांसाठी ही कामे निश्चितच दिलासादायक ठरणार आहेत. विकासकामांच्या माध्यमातून मतदारसंघातील मूलभूत सुविधांचे जाळे अधिक सक्षम करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की सौरऊर्जेच्या माध्यमातून घरकुलधारकांनी केवळ पाच हजार रुपये भरून सोनार घेतल्यास भविष्यातील वीज बिलाच्या अडचणी त्यांच्यासमोर राहणार नाही अशी यावेळी त्यांनी सांगितले पुढे ते म्हणाले की, राज्यात देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना विलास मिळाला असून, दुष्काळाची आगरी म्हणून फडणवीस सरकारने दिवाळीपूर्वीच पाच पाच हजार रुपये अग्रीम रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, तहसीलदार भारत गंगावणे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री पोळ, वीज वितरण कंपनीचे उपअभियंता कुमावत तुकाराम सोळंके रवींद्र सोळंके बंकटराव सोळंके संभाजी वारे गजानन लोणीकर प्रदीप ढवळे शिवाजी पाईकराव नितीन जोगदंड बाबाराव थोरात रामदास काका सोळंके नसरुल्ला काकड, अमोल जोशी बबलू सातपुते आसिफ कच्ची मुजीब राज, बाबा सोळंके श्री गांजाळे, सिताराम राठोड रमेश राठोड पद्माकर कवडे, मुरली राठोड किरण अंभोरे भरत अंभोरे सुदामराव प्रधान, रंगनाथ येवले शहाजी राक्षे, दिगंबर मुजमले, महादेव वाघमारे सिद्धेश्वर केकान सनी तनपुरे माऊली तनपुरे बाळासाहेब तनपुरे अर्जुन राठोड नितीन जोगदंड रमेश आढाव वसंत राजबिंडे, वसंत भापकर विकास शेळके गजानन चवडे रामजी मरळ शिवाजी अवचार संजय अवचार नामदेवराव खोसे उद्धवराव वायाळ राजेंद्र वाया जगदीश पडोळकर माधव सिंग जनकवार सचिन टेकाळे, कैलास अवचार धोंडीराम नवल गणेश सोळंके, विष्णू लिपणे, विक्रांत लिपणे गोरख गाडगे सर्जेराव आघाव, दत्ता रायकर, आकाश राठोड, यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

नगरसेवक चषक २०२६ वर इलेव्हन स्टार क्लब जालनाचा कब्जा; अंतिम सामन्यात दणदणीत विजय!

परतूरच्या खेळाडूंचे स्पर्धेत वर्चस्व; मॅन ऑफ द सिरीज, बेस्ट बॅट्समन आणि बेस्ट बॉलरचे तिन्ही पुरस्कार परतूरच्या खेळाडूंना!

जालना : नगरसेवक चषक २०२६ लेदर बॉल क्रिकेट टूर्नामेंटच्या पहिल्या सीझनमधील लीग सामन्यांचा थरार नुकताच अंतिम टप्प्यात पोहोचला. अटीतटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात इलेव्हन स्टार क्लब जालना संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. तर हिंद क्लब संघाने उपविजेतेपद पटकावले. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये इलेव्हन स्टार क्लब जालना संघाला नगरसेवक आसिफ अंसारी यांच्यातर्फे प्रदान करण्यात आले. तर द्वितीय पारितोषिक १५ हजार रुपये हिंद क्लब संघाला सगीर पहलवान यांच्यातर्फे देण्यात आले. या स्पर्धेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे जालना जिल्ह्यातील विविध भागांतील खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावले असताना परतूरच्या खेळाडूंनी वैयक्तिक पुरस्कारांवर आपले वर्चस्व सिद्ध केले. मॅन ऑफ द सिरीजचा पुरस्कार आकाश गोरे यांना, बेस्ट बॅट्समनचा पुरस्कार प्रेम शर्मा यांना, तर बेस्ट बॉलरचा पुरस्कार फरहान लाहमोदी यांना प्रदान करण्यात आला. तिन्ही वैयक्तिक पुरस्कार परतूरच्या खेळाडूंनी पटकावल्याने परतूरच्या क्रिकेटपटूंचे विशेष कौतुक होत आहे.

आयोजक मजहर खान (बिल्डर) यांनी परतूरच्या खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचे विशेष कौतुक केले. जिल्हा पातळीवरील स्पर्धेत परतूरच्या खेळाडूंनी दाखवलेली चमक निश्चितच अभिमानास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन अमन क्लबच्या वतीने करण्यात आले होते. यामध्ये मजहर खान (बिल्डर), नासेर खान, असद शेख, आबेद शेख आणि अब्जल खान यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्रमुख अध्यक्ष म्हणून नगरसेवक आसिफ अंसारी, नगरसेवक सगीर पहलवान, रहीम सेठ, मोसिन खान आणि इमरान पटेल यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दानिश भाई, नजीर पटेल, अंसार परसुवाले, मुस्तकीम भाई, राजेश दहीवाल आणि इमरान खान उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून शेख महेमुद, सिराज अहमद आणि सय्यद अफ्फान यांनी मोलाची भूमिका बजावली.

नगरसेवक चषक २०२६ च्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील क्रिकेटपटूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली. विजेत्या आणि सहभागी सर्व संघांचे आयोजकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच मजहर खान (बिल्डर) आणि त्यांच्या मित्रमंडळाने स्पर्धेला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

बोगस वृत्तपत्रांवर प्रशासनाची टांगती तलवार! जिल्हा माहिती कार्यालयाच्या भूमिकेकडे लक्ष

आरएनआय नोंदणी, अधिकृत शीर्षक आणि कायदेशीर मान्यता नसताना व्हॉट्सपवर वृत्तपत्रांचा बाजार; अनधिकृत प्रकाशनांविरुद्ध कारवाईची तयारी? कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेत पत्रकारितेच्या नावाखाली सुरू असलेल्या प्रकारांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज; खऱ्या पत्रकारितेचा सन्मान राखण्याचे आवाहन

जालना । प्रतिनिधी : पत्रकारिता हे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखले जाणारे महत्त्वाचे माध्यम आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून केले जाते. मात्र, अलीकडच्या काळात पत्रकारितेच्या नावाखाली बोगस वृत्तपत्रे, अनधिकृत प्रकाशने आणि व्हॉट्सपवर वृत्तपत्रांच्या नावाने सुरू असलेले प्रकार वाढत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे खऱ्या आणि अधिकृत पत्रकारितेसमोर आव्हान निर्माण झाले असून अशा प्रकारांवर प्रशासनाची टांगती तलवार राहणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी अधिकृत नोंदणी, मान्यताप्राप्त शीर्षक आणि आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करता वृत्तपत्रांच्या नावाखाली बातम्या प्रसारित केल्या जात असल्याचे चित्र समोर येत आहे. काही जण मोबाईलवर आकर्षक पानांची निर्मिती करून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (–ख) माध्यमातून बातम्या व मजकूर तयार करून त्यांना वृत्तपत्राचे स्वरूप देतात आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून त्यांचे वितरण करतात. अशा प्रकारच्या प्रकाशनांमुळे अधिकृत वृत्तपत्रे आणि प्रामाणिकपणे पत्रकारिता करणाऱ्या प्रतिनिधींच्या विश्वासार्हतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.



आरएनआय नोंदणी आणि कायदेशीर प्रक्रियेचा प्रश्न ऐरणीवर

वृत्तपत्र सुरू करण्यासाठी केवळ एखादे नाव निश्चित करणे किंवा बातम्यांचे पान तयार करणे पुरेसे नसते. त्यासाठी लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार शीर्षकाची प्रक्रिया, नोंदणी, प्रकाशक–संपादकांची माहिती, मुद्रण आणि प्रकाशनासंबंधी आवश्यक बाबींची पूर्तता करणे गरजेचे आहे. अधिकृत नोंदणी आणि कायदेशीर मान्यता नसताना वृत्तपत्र असल्याचा दावा करून त्याचा वापर केला जात असल्यास संबंधित यंत्रणांनी त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे. विशेषतः जिल्हा माहिती कार्यालयाने जिल्ह्यातील वृत्तपत्रांची अधिकृत (पान ३ वर)

अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

जालना, : जिल्ह्यात ८ ऑक्टोबर २०२६ ते ११ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत दिपावली सण साजरा होणार आहे. सदर सण, उत्सवाचे अनुषंगाने जिल्ह्यात व शहरात विविध कार्यक्रम व मिरवणुका आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच सद्यस्थितीत जिल्ह्यामध्ये विविध समाजाच्या आरक्षणाच्या मागण्यांच्या तसेच आरक्षण बचावाच्या अनुषंगाने तसेच दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचया प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे संपुर्ण जिल्ह्यासाठी कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी जारी केले आहे. पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा–या कर्मचा–यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा–या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे (पान ३ वर)

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना २५ हजार, शेतमजुरांना ५ हजार रुपये द्या!

सात दिवसांत मागण्या मान्य करा, अन्यथा जालना जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडणार; जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांचा प्रशासनाला इशारा

नवनाथ गव्हाणे बदनापूर /प्रतिनिधी : दुष्काळाच्या झळांनी शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक संकटात सापडले असताना शासनाकडून जाहीर करण्यात आलेली मदत अत्यंत तुटपुंजी असल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. दिवाळीपूर्वी प्रत्येक शेतकऱ्याला २५ हजार रुपये आगाऊ दुष्काळी अनुदान, तर शेतमजुरांना प्रत्येकी ५ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात यावी, अशी जोरदार मागणी पक्षाचे जालना जिल्हाप्रमुख मनीष राजेंद्र श्रीवास्तव यांनी तहसीलदार, बदनापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे बदनापूर तालुक्यासह संपूर्ण जालना



जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेली पिके उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. अशा परिस्थितीत दिवाळीसारखा सण साजरा करायचा कसा, असा गंभीर प्रश्न शेतकरी आणि शेतमजुरांसमोर उभा ठाकला आहे. शासनाने जाहीर केलेली पाच हजार रुपयांची एकरकमी मदत ही शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अत्यंत अपुरी असून, या तुटपुंज्या मदतीने शेतकऱ्यांचे संकट दूर होणार नाही. त्यामुळे शासनाने केवळ घोषणाबाजी न करता शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने २५ हजार रुपये आगाऊ दुष्काळी अनुदान जमा करावे आणि शेतमजुरांनाही पाच हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. (पान ३ वर)

मोटारसायकल चोरी करणारा विधिसंघर्षग्रस्त बालकासह एक आरोपी जेरबंद; १ लाख ४० हजारांच्या दोन दुचाकी जप्त

जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; जाफराबाद व भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल

जालना । प्रतिनिधी : जालना जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांचा छडा लावण्यासाठी पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली आहे. मोटारसायकल चोरी करणाऱ्या एका विधिसंघर्षग्रस्त बालकासह एका आरोपीला ताब्यात घेत पोलिसांनी तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक श्री. तेंगबीरसिंह संधू यांनी जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी विशेष



पथक तयार करून तपास सुरू केला. दि. ५ नोव्हेंबर रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार, अजय एकनाथ टेकाळे (वय १८ वर्षे, रा. हिंगणनगर, जालना) याच्याकडे चोरीची मोटारसायकल असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी नवीन मोंढा परिसरातील हॉटेल बकासूर बायपास रोड, जालना येथून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने चोरीची मोटारसायकल असल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ९० हजार रुपये किमतीची शाईन मोटारसायकल जप्त करण्यात आली. याप्रकरणी जाफराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३६/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल आहे. तसेच, आरोपीने विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून चोरीची आणखी एक मोटारसायकल खरेदी केल्याचे तपासात समोर आले. त्यानुसार पोलिसांनी ५० हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल जप्त केली. या प्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२६/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (पान ३ वर)

संपादकीय

वृक्षतोड म्हणजे शरमेची बाब नाही का ?

आज राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममार्गाने कमविलेली शेकडो हेक्टर जमीन आहे त्यावर सरकार वृक्ष लागवड का करीत नाही? सरकार म्हणते की,स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढला जाईल, सरकार प्रकल्पासाठी हजारो झाडे कापण्याच्या तयारीत आहे आणि ग्रामस्थांशी चर्चा करण्याची भाषा करतात हा सर्व सरकारचा लपंडाव सुरू असल्याचे दिसून येते.जर शिवरायांचा इतिहास आणि जागतिक वारसा जीवीत ठेवायचा असेल तर, टोरंट प्रकल्पाला थांबविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने पेटून उठले पाहिजे व यापुढे टोरंट सारखे प्रकल्प थांबवुन निसर्ग वाचविला पाहिजे आणि याचे पालन वनविभागाने सुध्दा केले पाहिजे.कारण आज जंगल तोडीमुळे अनेक पशुपक्षांचे घरे उद्धस्त झाली आहेत व त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे याची जाणीव सरकारने व वनविभागाने ठेवली पाहिजे.सरकारने प्रकल्प अवश्य उभारावे याला कोणाचाही विरोध नाही.परंतु निसर्गाची राखरांगोळी होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घेतली पाहिजे. कारण एक झाड मोठे व्हायला कमीत कमी ५ ते १० वर्षाचा कालावधी लागतो म्हणजे(१८२५ ते ३६५० दिवस)आणि ५ ते १० वर्षाचा कालावधी म्हणजे कमी नाही याची जाणीव सरकारने ठेवली पाहिजे.आज सरकार मोठ्यांने दावे करीत आहे की, आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करीत आहोत. परंतु सत्यपरिस्थिती अशी आहे की, फक्त फोटो सेशन पुरते वृक्षारोपण असते त्यानंतर त्या वृक्षांकडे कोणताही राजकीय पुढारी ढुंकूनही पाहत नाही ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे सरकारच्या मार्फत होणारे ९० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असते व १० टक्के वृक्षारोपण जमिनीवर होते.त्यामुळे सरकारच्या करणीत आणि कथनीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.टोरंट पॉवर प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर जरी असला तरी या प्रकल्पाचा मोठा धोका वन्यजीव प्राण्यांना व पर्यटकांना होईल यात तिळमात्र शंका नाही.आज वृक्षतोडीमुळे अनेक औषधीयुक्त वृक्ष लुप्त झाली आहेत व काही झाडे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्याचप्रमाणे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांची संख्या कमी झाली आहे.अशी भयावह गंभीर परिस्थिती वृक्षतोडीमुळे राज्यासह देशात निर्माण झाली आहे.त्यामुळे सरकारने वन्यप्राण्यांची घरे उद्धस्त होणार नाही व त्यांच्या जीवाला धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे; सोबतच हवामानातील वाढता बदल पहाता व स्थल ,जल, वायू प्रदूषणाचा वाढता प्रभाव लक्षात घेता निसर्गाची जोपासना करण्याचा संकल्प सरकारने घेतला पाहिजे व टोरंट प्रकल्पाला ताबडतोब स्थगिती देऊन निसर्गाचे व वन्यप्राण्यांचे रक्षण व्हायला हवे.

राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली अंदाधुंद वृक्षांची कत्तल होत आहे.याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील टोरंट प्रकल्प सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. एकीकडे वृक्ष कटाईमुळे ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी कमी होत असुन सर्वांचा जीव गुदमरत आहे;तर दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे यामुळे मानव व पशुपक्षांचे जगणे कठीण झाले असून सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात विकासाच्या नावाखाली वृक्षांची बेसुमार कटाईचा सपाटा जोरदार सुरू आहे त्यामुळे असे वाटत आहे की,देशात हे चाल्लय तरी काय! झाडांची अशीच कत्तल होत रहाली तर असे समजायला हरकत नाही की, माणसातील माणुसकी हरपली व मानुस माणुसकीत न रहाता जनावरापेक्षा निपत्तर झाला आणि माणुसकी संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही. आज सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने ज्याची नितांत गरज आहे अशा वृक्ष देवतेची व पृथ्वी मातेची सरकार व वनविभाग सरेआम अवहेलना करीत असून कत्तल करीत आहे.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतुंनी स्वास घ्यायचा कसा असा गंभीर आणि जटील प्रश्न देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होत आहे.आज आपल्यालाच नाही तर सर्वांनाच निसर्गामुळे म्हणजेच वृक्षांमुळे नैसर्गिक ऑक्सिजन मिळत आहे व सर्वत्र सुखशांती दिसून येते. परंतू देशासह राज्यात अनेक प्रकल्प उभारून प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे. सरकारने गेल्या काही वर्षांत निसर्गाचे संपूर्ण वाटोळे केले असून त्याचा परिणाम म्हणून,वनवे लागने,भुस्खलन,अती उष्णता,पिण्याच्या पाण्याची पातळी कमी होणे इत्यादी अनेक समस्यांनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यांचे गंभीर परिणाम अलनिनोच्या माध्यमातून राज्यासह देशात दिसत आहे. सरकारने अनेक प्रकल्पांचा सपाटा लावला असला तरी अनेक प्रकल्पांच्या तुलनेत वृक्षलागवड नगन्य असल्याचे दिसून येते. कारण प्रश्न असा उद्भवतो की, जमीनीवर अवाढव्य प्रकल्प उभारल्यानंतर सरकार झाडे लावणार कुठे? सरकार प्रकल्प उभारल्यानंतर झाडे लावण्याचे जे दावे करतात ते संपूर्ण दावे खोटे व फोल असल्याचे मी समजतो आणि हेच काम सरकार कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवर प्रकल्पाच्या बाबतीत करीत आहे.सरकार म्हणते की, टोरंट प्रकल्पाला लागणारी २५३ हेक्टर जमीनीच्या बदलत्या, दुसऱ्या २५३ हेक्टर पर्यायी जमिनीवर ९० हजार झाडे लावणार असल्याचे सरकार सांगत आहेत.मला हे समजत नाही की,जमीन काय झाडांना लागते का? अचानक २५३ हेक्टर जमीन सरकार उपलब्ध करून देणार कोठून आणि आता लावलेली झाडे मोठी व्हायला कमीत कमी दहा वर्षे लागतील याचा विचार सरकार का करीत नाही?सरकारच्या या प्रकल्पावरून सिध्द होते की, सरकार जी झाडे लावण्याची गोष्ट करीत आहे ती फक्त कागदावरच राहिल कृतीत होने कदापि शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.जो रायगड जिल्हा जगप्रसिद्ध आहे व ज्या भुमित शिवाजी महाराजांचा इतिहास दडलेला आहे अशा हिरवागार गालिचा सरकार विकासाच्या नावाखाली नेस्तनाबूत करीत असेल तर ही बाब कोन्हिही सहन करणार नाही.सरकारने जर जबरदस्तीने वृक्षतोड केली तर,संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्या शिवाय रहाणार नाही ही बाब सरकारने व वनविभागाने लक्षात ठेवली पाहिजे. देशातील काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ दिसून येत आहे.एवढे सर्व गंभीर परिणाम पृथ्वीवर सरकारला दिसत असून सुद्धा नवीन प्रकल्पाच्या उभारणीसाठी लाखों वृक्षांची कत्तल सरकार करण्याच्या तयारीत सरकार आहे ही अत्यंत शरमेची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल.

दुष्काळग्रस्तांना मोठा दिलासा;

मुंबई: राज्यात उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदतीचा हात देण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता 'मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष' थेट तालुकास्तरावर स्थापन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, या प्रत्येक कक्षात स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार असून, त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील नागरिकांसाठी आरोग्यविषयक सेवा अधिक प्रभावीपणे राबविता येणे शक्य होणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबतचा आज अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. खरीप हंगाम २०२६ मध्ये 'ट्रिगर-१' मधील दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये हा विशेष कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संबंधित तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयामध्ये या कक्षाचे कामकाज चालेल. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या कक्षात एका स्वतंत्र वैद्यकीय अधिकाऱ्याची कक्षप्रमुख म्हणून नियुक्ती केली जाईल. त्यांच्या मदतीसाठी लिपिक व टंकलेखक दिले जाणार असून, कक्षासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांची पूर्तता गटविकास अधिकाऱ्यांनी प्राधान्याने करावयाची आहे. या उपक्रमांतर्गत गरजू रुग्णांना आधी आयुष्मान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार विभागाच्या योजना आणि धर्मादाय रुग्णालयांच्या माध्यमातून पात्रतेनुसार उपचार मिळवून दिले जातील. या योजनांसाठी जे रुग्ण अपात्र ठरतील, त्यांच्या उपचाराचे प्रस्ताव संलग्न रुग्णालयामार्फत ऑनलाइन प्रणालीद्वारे मंजुरीसाठी पाठवले जातील आणि हा कक्ष त्यासाठी रुग्णांना पूर्ण मार्गदर्शन करेल. तसेच उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि आशा सेविकांच्या माध्यमातून गरजू रुग्णांचा शोध घेऊन कोणताही रुग्ण उपचारांपासून वंचिता राहू नये, याची सर्वस्वी जबाबदारी या कक्षावर राहणार आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन स्तरांवर विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष स्थानिक आमदार असतील, तर उपविभागीय अधिकारी (महसूल) सहअध्यक्ष म्हणून काम पाहतील. यात तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन आणि केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशनचे प्रतिनिधी सदस्य असतील, तर कक्षप्रमुख या समितीचे सदस्य सचिव असतील. दुसरीकडे, जिल्हास्तरीय समितीचे पालकमंत्री अध्यक्ष, जिल्हाधिकारी सहअध्यक्ष आणि जिल्हा आरोग्य अधिकारी सदस्य सचिव असतील, तसेच वैद्यकीय क्षेत्रातील दोन समाजसेवक या समितीत शासकीय सदस्य म्हणून पाहतील. दुर्गम भाग, मोठी लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची कमतरता असलेले परिसर ओळखून प्राधान्याने उपाययोजना करण्यासाठी या दोन्ही समित्यांनी महिन्यातून किमान दोन बैठका घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. या समित्यांद्वारे पिण्याच्या पाण्याशी व उष्णतेशी संबंधित आजारांचा आढावा घेणे, आरोग्य शिबिरे आयोजित करणे, फिरती वैद्यकीय पथके आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवांचे नियोजन केले जाईल. यादरम्यान महिला, बालके, ज्येष्ठ नागरिक तसेच मधुमेह आणि रक्तदाबग्रस्तांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र मेडिकल परिषद आणि स्थानिक खासगी रुग्णालयांच्या आरोग्य तज्ज्ञांची मदत घेऊन दुष्काळग्रस्त भागात आरोग्य शिबिरे भरवली जातील आणि रुग्णांना आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले जातील. तालुका स्तरावरील कक्ष आपल्या दैनंदिन कामकाजाचा आणि शिबिरांचा अहवाल जिल्हा कक्षाकडे सादर करेल, तर जिल्हा कक्ष सर्व तालुक्यांचे अहवाल एकत्र करून मंत्रालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे पाठविणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीची यंत्रणा अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. तालुका स्तरावर हा कक्ष सुरू झाल्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील गरजू रुग्ण वेळेत निदर्शनास येतील, त्यांना योग्य उपचार आणि आर्थिक मदत मिळवणे सुलभ होईल आणि कोणताही गरजू रुग्ण केवळ आर्थिक अडचणीमुळे उपचारांपासून वंचित राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांनी व्यक्त केला आहे.

'नाकाड्या चापड्या' या विषारी सापाची नव्याने नोंद



सिंधुदुर्ग: पश्चिम घाटातील जैवविविधतेच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारे संशोधन नुकतेच एका आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित झाले आहे. वनश्री फाउंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत आणि प्रा. डॉ. सदाशिव मोरे यांच्या संशोधनातून महाराष्ट्र राज्यातील पश्चिम घाट परिसरात 'नाकाड्या चापड्या' (कूपिरश्रश हूपिरश्रश) या विषारी सापाची नवीन नोंद करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे दोडामार्ग तालुक्यातील सरपटणाऱ्या प्राण्यांच्या विविधतेच्या अभ्यासात मोलाची भर पडली असून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्र राज्य वगळता याआधी कर्नाटक आणि गोवा या राज्यांमध्ये नाकाड्या चापड्याची नोंद झालेली होती, परंतु आता दोडामार्ग तालुक्यातील चार वेगवेगळ्या ठिकाणांवर या सापाची प्रथमच नोंद करण्यात आली आहे. या संशोधनादरम्यान सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील केर, घोडगेवाडी, भेकुर्ली आणि फुकेरी या परिसरांमध्ये या सापाच्या प्रजातीचा वावर असल्याचा शोध लागला. पश्चिम घाट हा जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध प्रदेश मानला जातो आणि येथे अनेक प्रकारचे सरपटणारे प्राणी, उभयचर, पक्षी, सस्तन प्राणी व कीटक मोठ्या प्रमाणावर आढळतात. असे असले तरी, या प्रदेशातील अनेक प्रजातींचे वितरण, अधिवास आणि पर्यावरणीय महत्त्व याबाबत अद्यापही सखोल संशोधनाची मोठी आवश्यकता होती. अशा या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर करण्यात आलेल्या या संशोधनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या सापाची शास्त्रीय माहिती देताना संशोधकांनी सांगितले की, या सापाचे इंग्लिश नाव 'क्वीन पीशव व्लिंग्लिशी' असून मराठीत त्याला 'नाकाड्या चापड्या' आणि शास्त्रीय भाषेत 'कूपिरश्रश हूपिरश्रश' असे म्हटले जाते. हा साप आकाराने लहान असणाऱ्या पिट व्हायपर (झळीं तळशी) गटातील विषारी सापांपैकी एक असून त्याच्या शरीराची एकूण लांबी साधारणपणे ४०० मिमीपर्यंत असते. याच्या शरीराचा रंग तांबूस-तपकिरी ते करड्या-तपकिरी छटेचा असतो. शरीरावर गडद तपकिरी रंगाच्या खुणा असून त्या डोक्याच्या पुढील भागापासून शेपटीच्या मागील टोकापर्यंत स्पष्टपणे दिसून येतात. या सापाचे डोके रुंद व त्रिकोणी आकाराचे असून त्यावर मोठ्या आणि जवळजवळ मांडलेल्या खवल्यांची विशिष्ट रचना असते. डोक्याच्या पुढील टोकाला चामखिळासारखा एक उंचवटा असतो, म्हणूनच त्याला 'नाकाड्या' असे नाव पडले आहे. या सापाचे डोळे तुलनेने मोठे असून त्यांच्या सभोवती अनियमित रचनेची खवले आढळतात. शरीराच्या पाठीवरील मधील रेषेच्या दोन्ही बाजूंना गडद तपकिरी ते काळसर खुणा पाहायला मिळतात, तसेच या सापाची शेपटी आखूड व निमुळती असून पोटाकडील भाग करड्या-तपकिरी रंगाचा व त्यावर गडद ठिपके असतात. या सर्व शारीरिक वैशिष्ट्यांमुळे या प्रजातीची ओळख पटवणे आणि इतर सर्पप्रजातींपासून तिचे वर्गीकरण करणे सहज शक्य होते. नाकड्या चापड्याच्या या नवीन संशोधनामुळे स्थानिक जैवविविधतेच्या दस्तऐवजीकरणाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. पश्चिम घाटातील जैवविविधतेचे योग्य संवर्धन करण्यासाठी प्रत्येक प्रजातीची अचूक ओळख, तिचे भौगोलिक वितरण आणि अधिवास यांची शास्त्रीय नोंद असणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यासारख्या जैवविविधतेने समृद्ध असलेल्या भागात स्थानिक संशोधक आणि निसर्ग अभ्यासकांनी केलेले क्षेत्रीय निरीक्षण आणि परिसर अभ्यास अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. या संशोधनामुळे परिसरातील सर्प विविधतेच्या अभ्यासाला मोठी चालना मिळणार असून भविष्यातील संशोधकांसाठीदेखील ही नोंद अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या संपूर्ण संशोधनासाठी अनुराग सिनारी, तुषार देसाई, उदय सातार्डेकर आणि संजय नाटेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. क्षेत्रीय निरीक्षण, माहिती संकलन आणि संशोधन प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यात त्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वनश्री फाउंडेशनच्या माध्यमातून स्थानिक जैवविविधतेचे दस्तऐवजीकरण, वन्यजीव संवर्धन आणि पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी सातत्याने विशेष प्रयत्न केले जात आहेत. या संशोधनाच्या प्रकाशनामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आणि विशेषतः दोडामार्ग तालुक्यातील जैवविविधता संशोधनाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळण्यास मोठी मदत होणार आहे. स्थानिक निसर्गसंपदेचा शास्त्रीय अभ्यास करून तिचे खरे महत्त्व जगासमोर आणण्याच्या दृष्टीने हे संशोधन निश्चितच एक उल्लेखनीय यश मानले जात आहे.

पान १ वरून

दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना

सात दिवसांचा अल्टिमेटम! शेतकरी आणि शेतमजुरांच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, यासाठी प्रशासनाला सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत मागण्या मान्य न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने संपूर्ण जालना जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव यांनी दिला आहे. त्यामुळे आता शासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे जिल्ह्यातील शेतकरी व शेतमजुरांचे लक्ष लागले आहे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, किसान सेवा जिल्हा संघटक भानुदास नाना घुगे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख रूपम घुगे, बदनापूर तालुकाप्रमुख जयप्रकाश चव्हाण, युवासेना उपजिल्हाप्रमुख कारभारी म्हसलेकर, राहुल जन्हाड, काकासाहेब ढाकणे, युवासेना उपतालुकाप्रमुख फैजान मिर्झा, अंकुश पवार, संजय जाधव, गजानन लहाणे, बळीराम कोल्हे, विजय दीक्षित, युनुसखाँ पठाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मोटारसायकल चोरी करणारा

या कारवाईत विधिसंघर्षग्रस्त बालकासह आरोपी अजय टेकाळे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेंगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी भोकरदन श्री. नितीन काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र बाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर बाघ, दीपक घुगे, सागर बाबिस्कर, धिरज भोसले व सोपान घिसाडसागर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली. मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे कौतुक होत आहे.

शास्त्रीय माहिती देताना संशोधकांनी सांगितले की, या सापाचे इंग्लिश नाव 'क्वीन पीशव व्लिंग्लिशी' असून मराठीत त्याला 'नाकाड्या चापड्या' आणि शास्त्रीय भाषेत 'कूपिरश्रश हूपिरश्रश' असे म्हटले जाते. हा साप आकाराने लहान असणाऱ्या पिट व्हायपर (झळीं तळशी) गटातील विषारी सापांपैकी एक असून त्याच्या शरीराची एकूण लांबी साधारणपणे ४०० मिमीपर्यंत असते. याच्या शरीराचा रंग तांबूस-तपकिरी ते करड्या-तपकिरी छटेचा असतो. शरीरावर गडद तपकिरी रंगाच्या खुणा असून त्या डोक्याच्या पुढील भागापासून शेपटीच्या मागील टोकापर्यंत स्पष्टपणे दिसून येतात. या सापाचे डोके रुंद व त्रिकोणी आकाराचे असून त्यावर मोठ्या आणि जवळजवळ मांडलेल्या खवल्यांची विशिष्ट रचना असते. डोक्याच्या पुढील टोकाला चामखिळासारखा एक उंचवटा असतो, म्हणूनच त्याला 'नाकाड्या' असे नाव पडले आहे. या सापाचे डोळे तुलनेने मोठे असून त्यांच्या सभोवती अनियमित रचनेची खवले आढळतात. शरीराच्या पाठीवरील मधील रेषेच्या दोन्ही बाजूंना गडद तपकिरी ते काळसर खुणा पाहायला मिळतात, तसेच या सापाची शेपटी आखूड व निमुळती असून पोटाकडील भाग करड्या-तपकिरी रंगाचा व त्यावर गडद ठिपके असतात. या सर्व शारीरिक वैशिष्ट्यांमुळे या प्रजातीची ओळख पटवणे आणि इतर सर्पप्रजातींपासून तिचे वर्गीकरण करणे सहज शक्य होते.

मुंबई पालिकेची प्रतिमा मलिन करण्याचे कारस्थान करू नये : नसता कारवाई



मुंबई महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत यशोधर फणसे यांनी हरकतीच्या मुद्द्याद्वारे बोरीवलीतील अतिक्रमणे वेळेवर न हटवल्याने आयुक्तांना पाच लाखांचा दंड ठोठावला आहे आणि त्यांचे व त्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांचे नोव्हेंबर महिन्याचे मानधन रोखून ठेवण्याचे निर्देश दिले आहेत असे सांगत वर्सोवा येथील अतिक्रमणे हटवली जात नाही. तसेच ज्या अतिक्रमणांवर कारवाई केली आहे, ती नामधारी असून केवळ भोके पाडून ठेवली आहे. त्यामुळे तिथे राहणाऱ्या लोकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे अर्धवट केलेली कारवाई पूर्ण करावी तसेच सर्वच येथील सर्वच अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी केली. यावर सभागृहनेते गणेश खणकर यांनी खासगी जमिनी मालकाची ही जागा असून याठिकाणी तत्कालिन बेस्ट समिती अध्यक्ष संजय पोतनीस यांनी भूमिपुजन केले होते. हे अतिक्रमण खरे तर विकासकाने काढून बस आगाराच्या जागेचा विकास करून द्यायला हवा. पण ते न देता त्यांनी महापालिकेला पार्टी बनवून टाकले. त्यामुळे महापालिकेच्या विधी विभागाच्यावतीने योग्य बाजू मांडता न आल्याने ही वेळ आयुक्तांवर आली आहे.त्यामुळे प्रशासन काय कारवाई करणार असा सवाल त्यांनी केला. तर यशवंत किल्लेदार यांनी आयुक्तांवर अशाप्रकारची वेळ आणणाऱ्यांवर प्रशासन काय कारवाई करणार असा सवाल केला यावर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी इंग्रजीचे मराठी अनुवाद करायचा असल्याचे प्रतिज्ञापत्रकात नमुद केले आहे. तसेच यापूर्वी २०२५ आणि त्यानंतर २०२६मध्ये निर्देश दिले होते. त्यानंतर जुलै २०२६ रोजी अंतरिम आदेश देण्यात आले. या दरम्यान आयुक्तांना किती वेळा कल्पना दिली याचे उत्तर विभागाकडे नाही. त्यामुळे कुठल्या लक्ष्मीदर्शनामुळे याकडे दुर्लक्ष होत होते असा सवाल त्यांनी उपस्थित केला. ण प्रशासन एकच असून प्रशासनाची प्रतिमा तीच लोकप्रतिनिधींची प्रतिमा राहते. त्यामुळे त्यामुळे यासंदर्भात ज्याने न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले त्यांना सर्व प्रथम निलंबित करावे तसेच संबंधित जे जे अधिकारी असतील त्यांच्यावर निलंबनाची कठोर कारवाई करण्यात यावी असे स्पष्ट करत पुढील बैठकीत या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देश प्रभाकर शिंदे यांनी प्रशासनाला दिले आहेत. बोरीवली पूर्व येथील स्वामी विवेकानंद मार्गावर बेस्ट बस स्थानकासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावरील अतिक्रमण न हटवल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने महापालिका आयुक्त आश्विनी भिडे यांना ५ लाख रुपयांचा दंड आणि नोव्हेंबरचे वेतन रोखण्याचे निर्देश दिल्यामुळे महापालिकेची प्रतिमा मलिन झाली. परंतु या प्रकरणात जून २०२६ रोजी अंतिम आदेश दिल्यानंतर आणि न्यायालयात चुकीचे प्रतिज्ञापत्र साद करत एकप्रकारे महापालिका आयुक्तांसह सर्वोच्च न्यायालयाचीही दिशाभूल करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांना दंडित होण्याची नामुष्की याच अधिकाऱ्यांमुळे आली आहे. त्यामुळे आयुक्तांवर ही वेळ आणून महापालिकेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केल्यामुळे संबंधित विधी आणि आर मध्य विभागाच्या अधिकाऱ्यांना कडक कारवाई करून त्यांना निलंबित करण्यात यावे असे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी दिले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पाच हजारात शेतकऱ्यांची दिवाळी हा दिलासा की शेतकऱ्यांची थट्टा ?





भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. देशाची अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण जीवनाचा कणा म्हणजे शेतकरी, असे भाषणांमधून वारंवार ऐकायला मिळते. मात्र, प्रत्यक्ष मदतीची वेळ येते तेव्हा याच अन्नदात्याच्या पदरात किती पडते, हा प्रश्न उपस्थित होतो. आज शासनाने विविध घटकांना बोनसच्या स्वरूपात दहा हजार रुपये, अर्ध्या पगाराइतकी रक्कम किंवा पूर्ण पगाराइतका लाभ दिल्याच्या चर्चा आहेत. काही ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिवाळीचा आर्थिक दिलासा मिळाला. यात गैर काहीच नाही. मेहनत करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला सणासुदीला आर्थिक मदत मिळालीच पाहिजे. पण मग वर्षभर ऊन, वारा, पाऊस आणि निसर्गाच्या लहरीपणाशी झुंज देणाऱ्या शेतकऱ्याचा विचार करताना शासनाची हात आखडता भूमिका का? शेतकऱ्याला दिवाळी साजरी करण्यासाठी पाच हजार रुपये देऊन शासनाने नेमके काय साध्य केले? एवढ्या महागाईच्या काळात पाच हजार रुपयांत शेतकऱ्याच्या कुटुंबाची दिवाळी साजरी होऊ शकते का? घरातील किराणा, मुलांचे कपडे, फराळाचे साहित्य, दिवाळीचे दिवे, तेल, साखर, तेलबिया, औषधे, शेतीसाठी लागणारे साहित्य आणि रोजच्या गरजा भागवताना पाच हजार रुपये किती दिवस पुरणार? ज्या शेतकऱ्याच्या घामातून देशाच्या ताटात अन्न येते, त्याच्या घरात मात्र सणाच्या दिवशी आर्थिक विवंचना असावी, ही कोणत्या विकासाची निशाणी आहे? शेतकऱ्याला मदत करताना पाच हजार रुपयांचा आकडा शासनाला मोठा वाटतो; पण त्याच शेतकऱ्याने वर्षभरात शेतीवर केलेला खर्च, घेतलेले कर्ज, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि वीजबिल यांचा हिशेब कोण मांडणार? पाऊस वेळेवर पडला नाही तर शेतकरी संकटात, अतिवृष्टी झाली तर संकटात, गारपीट झाली तर संकटात, बाजारभाव पडले तर संकटात आणि पीक हातात आले तरी विक्रीची हमी नाही. म्हणजे शेतकऱ्याच्या आयुष्यात संकटांचा पाऊस कधी थांबणार? शासनाने ३०४ दुष्काळी तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांसाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत जाहीर केली असून, त्यासाठी ७,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही मदत सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांसाठी आहे. त्यामुळे शासनाने काहीच केले नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. परंतु प्रश्न मदतीच्या घोषणेचा नसून मदतीच्या रकमेचा आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजांचा आहे. पाच हजार रुपये ही केवळ तात्पुरती अग्रिम मदत आहे; संपूर्ण पीक नुकसानभरपाई नाही. शेतकऱ्याच्या शेतातील पीक वाळून गेले, कापसाचे नुकसान झाले, सोयाबीनला अपेक्षित भाव मिळाला नाही, फळबागा पाण्याअभावी करपल्या, तर त्याच्या नुकसानीची भरपाई पाच हजार रुपयांनी कशी होणार? एका एकरात पीक घेण्यासाठी हजारो रुपयांचा खर्च येतो. बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि मशागतीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. शेतकऱ्याला पिकातून उत्पन्न मिळाले नाही तर त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार? मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, घरखर्च, आरोग्य आणि बँकेचे कर्ज यांची जबाबदारी कोण घेणार?

शेतकऱ्याला मदत देताना अटींचा डोंगर कशासाठी?

शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा झाली की त्यानंतर नवीन प्रश्न निर्माण होतात. कोण पात्र, कोण अपात्र, किती नुकसान झाले, कोणत्या नोंदीत नाव आहे, फार्मर आयडी आहे का, ई-केवायसी झाली आहे का, बँक खाते आधारशी जोडले आहे का, अशा अनेक अडचणींमुळे प्रत्यक्ष लाभार्थी शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण होते.

शासनाने पात्र शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, प्रत्यक्षात एखाद्या शेतकऱ्याचे नुकसान झाले असेल आणि केवळ तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणामुळे त्याला मदत मिळत नसेल, तर त्याला न्याय कोण देणार? शेतकऱ्याने कार्यालयां चे उंबरठे झिजवायचे, कागदपत्रे जमा करायची आणि शेवटी मदतीच्या प्रतीक्षेत राहायचे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. आज प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि सत्ताधारी पक्षाच्या समर्थकांनी एकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या घरात जाऊन दिवाळी पाहावी. शेतकऱ्याच्या घरात फराळासाठी किती साहित्य आहे, मुलांसाठी नवीन कपडे घेण्याची ऐपत आहे का, घरातील वृद्ध आई-वडिलांच्या औषधांसाठी पैसे आहेत का, याची चौकशी करावी. शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा दिवा पेटतो, पण त्याच्या मनातील चिंतेचा अंधार कायम असतो. एका बाजूला कर्जाचा डोंगर, दुसऱ्या बाजूला पिकांचे नुकसान आणि तिसऱ्या बाजूला बाजारभावाची अनिश्चितता. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांची मदत देऊन शेतकऱ्याने आनंदाने दिवाळी साजरी करावी, अशी अपेक्षा ठेवणे कितपत योग्य आहे? शेतकरी कधीही सरकारकडे मोफत पैसा मागत नाही. तो आपल्या कष्टाचा योग्य मोबदला मागतो. त्याच्या मालाला हमीभाव मिळावा, नैसर्गिक आपत्तीमध्ये योग्य नुकसानभरपाई मिळावी, शेतीला पुरेसे पाणी मिळावे, वीज वेळेवर मिळावी आणि कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यासाठी ठोस उपाययोजना व्हाव्यात, एवढीच त्याची अपेक्षा आहे.

भारत खरोखर कृषिप्रधान आहे का? भारत कृषिप्रधान देश आहे, असे आपण म्हणतो. मात्र, देशाचा अन्नदाता आर्थिकदृष्ट्या सक्षम नसेल, त्याला सणासुदीला दोन पैसे खर्च करण्याची चिंता असेल, त्याच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असेल, तर कृषिप्रधान देश असल्याचा अभिमान नेमका कशासाठी? शेतकरी जगला तर शेती जगेल, शेती जगली तर अन्नसुरक्षा टिकेल आणि अन्नसुरक्षा टिकली तर देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील. मग शेतकऱ्याच्या आर्थिक सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य का दिले जात नाही? शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी अधिवेशनात भाषणे होतात, घोषणा होतात, आश्वासने दिली जातात; पण प्रत्यक्ष मदतीच्या वेळी त्याच्या वाट्याला तुटपुंजी रक्कम येत असेल तर ही व्यवस्था आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. म्हणूनच राज्यातील प्रत्येक आमदार, खासदार, मंत्री आणि शासनाच्या निर्णयांचे समर्थन करणाऱ्या प्रत्येकाने या प्रश्नाचे उत्तर द्यावे. पाच हजार रुपये देऊन शेतकऱ्यांचे नेमके कोणते प्रश्न सुटणार आहेत? शेतीच्या एका हंगामात झालेल्या हजारो रुपयांच्या नुकसानीची भरपाई या रकमेतून कशी होणार? आणि महागाईच्या काळात या रकमेत शेतकऱ्याने कुटुंबाची दिवाळी कशी साजरी करावी? शेतकऱ्यांना केवळ दिवाळीपुरती मदत नको, तर वर्षभर सन्मानाने जगता येईल अशी आर्थिक व्यवस्था हवी. मदतीच्या घोषणा करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला शाश्वत आधार देण्याची गरज आहे. पाच हजार रुपयांचा अग्रिम दिलासा हा अंतिम उपाय होऊ शकत नाही. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, शेतकऱ्यांच्या घामावर देशाचे पोट भरते; पण त्याच शेतकऱ्याच्या घरात दिवाळी साजरी करण्यासाठी पैशांची कमतरता असेल, तर हा केवळ शेतकऱ्याचा प्रश्न नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाची किंमत पाच हजार रुपयांत मोजू नका. अन्नदात्याला मदतीची भीक नको, तर त्याच्या कष्टाला न्याय आणि जगण्याला सन्मान हवा!

पान १ वरून

बोगस वृत्तपत्रांवर प्रशासनाची

माहिती संकलित करून नोंदणीकृत प्रकाशने, त्यांचे शीर्षक, प्रकाशक, संपादक, प्रकाशनाचे स्वरूप आणि इतर आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. अधिकृत वृत्तपत्रांच्या नावाखाली अनधिकृतपणे प्रकाशन करणाऱ्यांची माहिती घेऊन नियमानुसार योग्य ती कार्यवाही होणे अपेक्षित आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर; पण पत्रकारितेच्या नावाखाली गैरप्रकार नकोत! आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता हे प्रभावी तंत्रज्ञान ठरत आहे. बातम्यांचे लेखन, छायाचित्रांची मांडणी, पानांची निर्मिती आणि आकर्षक वृत्तपत्रीय डिझाइन तयार करण्यासाठी -ख चा वापर केला जात आहे. मात्र, तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि त्याच्या माध्यमातून बनावट वृत्तपत्र तयार करून त्याला अधिकृत प्रकाशनाचा दर्जा देणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. काही ठिकाणी वृत्तपत्रासारखी पाने तयार करून त्यावर बातम्या प्रसिद्ध केल्या जातात. त्यानंतर ती पाने व्हॉट्सप ग्रुप, सोशल मीडिया आणि इतर डिजिटल माध्यमांवर प्रसारित केली जातात. अशा प्रकाशनांना अधिकृत वृत्तपत्र असल्याचे भासवून नागरिक, अधिकारी आणि व्यावसायिकांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा प्रकारांची चौकशी करून नियमांचे उल्लंघन होत असल्यास कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. खऱ्या पत्रकारितेचा सन्मान राखण्याची जबाबदारी पत्रकारिता ही केवळ ओळखपत्र, पदनाम किंवा वृत्तपत्राचे नाव लावण्यापुरती मर्यादित नाही. पत्रकाराने समाजाप्रती जबाबदारी स्वीकारून सत्यता पडताळलेली माहिती प्रसिद्ध करणे, जनतेचे प्रश्न मांडणे आणि प्रशासनाला उत्तरदायी ठेवणे अपेक्षित असते. अनेक पत्रकार प्रतिकूल परिस्थितीतही ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवक, आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न सातत्याने मांडत असतात. मात्र, काही अनधिकृत प्रकाशनांमुळे संपूर्ण पत्रकारिता क्षेत्राची प्रतिमा मलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अधिकृत आणि अनधिकृत प्रकाशनांमधील फरक स्पष्ट होणे गरजेचे आहे. पत्रकारितेच्या नावाखाली कोणत्याही प्रकारचा दबाव, आर्थिक मागणी किंवा गैरवापर होत असल्यास त्याचीही नियमानुसार चौकशी होणे आवश्यक आहे. जिल्हा माहिती कार्यालयाने पडताळणी मोहीम राबवावी जिल्ह्यातील सर्व अधिकृत वृत्तपत्रांची माहिती अद्ययावत करून त्यांची कायदेशीर कागदपत्रे आणि प्रकाशनाची स्थिती तपासावी. अनधिकृतपणे वृत्तपत्राचे नाव वापरणे, बनावट नोंदणीचा दावा करणे अथवा नागरिकांची दिशाभूल करणे असे प्रकार आढळल्यास संबंधित सक्षम यंत्रणेकडे प्रकरण पाठवून कायद्यानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच अधिकृत वृत्तपत्रांचे संपादक, प्रकाशक आणि प्रतिनिधी यांना आवश्यक नियम व मार्गदर्शक सूचनांची माहिती देणेही महत्त्वाचे आहे. यामुळे खऱ्या पत्रकारितेला प्रोत्साहन मिळेल आणि पत्रकारितेच्या नावाखाली गैरप्रकार करणाऱ्यांना आळा बसेल. एकंदरीत, पत्रकारितेच्या नावाखाली सुरू असलेल्या अनधिकृत प्रकाशनांच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घेण्याची वेळ आली आहे. मात्र, या प्रक्रियेत कायदेशीर मान्यता असलेल्या वृत्तपत्रांवर अन्याय होणार नाही आणि प्रामाणिक पत्रकारितेचे स्वातंत्र्य अबाधित राहील, याचीही काळजी घेणे तितकेच आवश्यक आहे. आता जिल्हा माहिती कार्यालय आणि संबंधित प्रशासकीय यंत्रणा याबाबत नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे जिल्ह्यातील पत्रकारिता क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी यांचे

उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही. त्याकरीता पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि. ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. १९ नोव्हेंबर, २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

रेल्वेच्या पुढील प्रगतीच्या प्रवासासाठी प्रेरणा



पान ४ वरून

अनुलोमच्या वतीने जालन्यात

जनसेवक अर्जुन डहाळे, अतुल उपाध्ये, शैलेश ठक्कर तसेच अनुलोम मित्र गौरव देशमाने, विजय खंदारे, रितेश देशमुख आणि मोहन मंचेवार यांची उपस्थिती होती. समाजातील गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचे उत्तम उदाहरण ठरला.

३३ वर्षांच्या शैक्षणिक सेवेनंतर निवृत्त

आहेत. सरांनी आम्हाला केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर जगण्याचे संस्कारही दिले, अशा शब्दांत माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थी, पालक आणि समाजाशी त्यांनी निर्माण केलेले जिव्हाळ्याचे नाते हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य असल्याचेही वक्त्यांनी सांगितले. आ संतोष पाटील दानवे यांनी पैठणकर यांच्या शिस्त, प्रेमळ स्वभाव आणि विद्यार्थ्यांशी असलेल्या आत्मीयतेचे कौतुक केले. निवृत्तीनंतरही त्यांचे मार्गदर्शन समाजाला लाभत राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी प्राचार्य संजय पैठणकर यांनी आपल्या जीवनप्रवासात साथ देणाऱ्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. श्री राजुरेश्वराच्या कृपेने वयाची ५८ वर्षे पूर्ण केल्याचा उल्लेख करत त्यांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, सौ. निर्मलाताई दानवे आणि आमदार संतोष पाटील दानवे सौ आशाताई मुकेश पांडे यांच्याकडून मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. स्व. वडील नारायणराव पैठणकर यांच्या संस्कारांचे स्मरण करताना त्यांनी आई, पत्नी, कुटुंबीय, नातेवाईक, विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक आणि हितचिंतकांच्या प्रेमाचा व सहकार्याचा आवर्जून उल्लेख केला.याप्रसंगी मातोश्री सौ निर्मलाताई दानवे, सेवानिवृत्त उच्च न्यायालयाचे सर न्यायधिश श्री किशोरजी सोनवणे, श्री राजाभाऊ देशमुख, छत्रपती संभाजीनगर चे भाजपाचे नगरसेवक अशोकजी दामले,मा नगरसेवक राजु भाऊ इंगळे,श्री फकीरा शेठ देशमुख, डॉ. शिरीष पवार यांच्यासह पैठणकर परिवार, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, शिक्षक वृंद, भोकरदन तालुका मराठी पत्रकार संघ,व्यापारी,मित्र मंडळी,आजी माजी विद्यार्थीआणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिवाळीत ध्वनी व वायू

जिल्हास्तरावर पोलीस अधीक्षक कार्यालयातील श्री. भुजंग नामदेव हातमोडे यांची नोडल अधिकारी म्हणून, नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याशी मो. क्र. ९१४५४८८०३८ या मोबाइल क्रमांकावर किंवा p.jalnamahapolice.gov.in या ई-मेलवर संपर्क साधता येणार आहे. तसेच सदर बाजार, जालना तालुका, कदीम जालना, चंदनझिरा, बदनापूर, अंबड, गोंदी, घनसावंगी, तीर्थपुरी, परतूर, मौजपुरी, मंठा, आष्टी, सेवली, भोकरदन, जाफराबाद, टेंभुर्णी, हसनाबाद व पारध या पोलीस ठाण्यांसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. फटाके फोडण्याच्या संदर्भात ध्वनी व वायू प्रदूषणाबाबत किंवा अन्य संबंधित तक्रारी असल्यास नागरिकांनी संबंधित पोलीस ठाण्याच्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच नोडल अधिकाऱ्यांचे मोबाइल क्रमांक व ई-मेल पत्ते उपलब्ध करून देण्यात आले असून, नागरिकांना ११२ या आपत्कालीन क्रमांकावर किंवा प्रत्यक्ष पोलीस ठाण्यात उपस्थित राहूनही तक्रार नोंदविता येणार आहे. दिवाळीचा सण शांततेत व सुरक्षित वातावरणात साजरा व्हावा, ध्वनी व वायू प्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे आणि प्रदूषणसंदर्भातील तक्रारी तातडीने पोलिसांच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे आवाहन जालना जिल्हा विशेष शाखेच्या पोलीस निरीक्षकांनी केले आहे.

मुंबई:'बॉम्बे, बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे'ची (इइउख) स्थापना १८५५ मध्ये झाली होती. याची सुरुवात गुजरातमधील अंकलेश्वर ते उत्राण दरम्यानच्या २९ मैल लांबीच्या ब्रॉड-गेज रेल्वे मार्गाच्या बांधकामातून झाली आणि त्याचे मुख्यालय सुरत येथे होते. त्यानंतर हा रेल्वे मार्ग मुंबईच्या दिशेने विस्तारला; उत्राण ते ग्रँड रोड दरम्यानचा विभाग २८ नोव्हेंबर १८६४ रोजी अधिकृतपणे वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. आजच्या पश्चिम रेल्वेच्या विकासक्रमातील ही एक अत्यंत महत्त्वाची घटना होती. गेल्या अनेक दशकांत पश्चिम रेल्वेने अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले असून, भारतीय रेल्वेच्या प्रमुख क्षेत्रांपैकी (झोन्स) एक म्हणून स्वतः ची ओळख निर्माण केली आहे. उपनगरीय भागातून शहराकडे येणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, १९६१ मध्ये ९ डब्यांच्या उपनगरीय (लोकल) गाड्या सुरू करण्यात आल्या. त्यानंतर, १९७२ मध्ये प्रतिष्ठित 'मुंबई-नवी दिल्ली राजधानी एक्सप्रेस'ची सेवा सुरू झाली, जी पश्चिम रेल्वेच्या यशाच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. गेल्या अनेक वर्षांत, पश्चिम रेल्वेने अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. यामध्ये केवळ महिलांसाठी असलेली जगातील पहिली उपनगरीय (लोकल) ट्रेन, भारतातील पहिली १५ डब्यांची उपनगरीय ट्रेन आणि पहिली पूर्णपणे वातानुकूलित (एसी) उपनगरीय ट्रेन सुरू करण्याचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, पश्चिम रेल्वेने वंदे भारत एक्सप्रेस, अमृत भारत एक्सप्रेस आणि नमो भारत रॅपिड रेल यांसारख्या आधुनिक प्रवासी सेवाही सुरू केल्या आहेत. तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपल्या कामकाजाचे आधुनिकीकरण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेली पश्चिम रेल्वे, नाविन्य, सुरक्षा, डिजिटलायझेशन आणि शाश्वत पद्धतींच्या अंमलबजावणीमध्ये आघाडीवर राहिली आहे. प्रवाशांसाठी अधिक चांगल्या सुविधा, तसेच 'ट्रेन मॅनेजमेंट सिस्टम', 'ऑटोमॅटिक तिकीट वेंडिंग मशीन्स' (-ढतची), मोबाईल तिकीटिंग आणि डिजिटल पेमेंट पर्यायांसारख्या डिजिटल उपक्रमांमुळे रेल्वे प्रवास अधिक सोयीस्कर आणि पारदर्शक होण्यास मोठी मदत झाली आहे. आपल्या संपूर्ण इतिहासात, पश्चिम रेल्वेने सातत्याने आपली क्षमता आणि यश सिद्ध केले आहे. अवघ्या २९ मैलांच्या जाळ्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये ६००० मार्ग-किलोमीटरपेक्षा जास्त अंतरापर्यंत विस्तारला आहे. आपल्या ७६ व्या स्थापना दिनानिमित्त, पश्चिम रेल्वे आपल्या विद्यमान आणि माजी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे योगदान आणि समर्पण यांचा गौरव करते. त्यांच्याच प्रयत्नांतून हा गौरवशाली वारसा घडला असून, तो आजही रेल्वेच्या पुढील प्रगतीच्या प्रवासासाठी प्रेरणा देत आहे. पश्चिम रेल्वेकडून ५ नोव्हेंबर २०२६ रोजी अर्थात उद्या ७६ वा स्थापना दिवस साजरा करणार आहे. राष्ट्राच्या सेवेतील या गौरवशाली प्रवासातील हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे.

या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून, खार रेल्वे स्थानकाच्या 'एलिव्हेटेड डेक'वर (ब्रिज) पश्चिम रेल्वेचा समृद्ध इतिहास आणि वारसा दर्शवणारे एक प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे. हे प्रदर्शन ५ नोव्हेंबर २०२६ ते ७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले असेल. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, विनीत अभिषेक यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, ५ नोव्हेंबर १९५१ रोजी 'बीबी अँड सीआय' (बॉम्बे, बडोदा अँड सेंट्रल इंडिया) रेल्वेचे, सौराष्ट्र, राजपुताना आणि जयपूरसह विविध संस्थानांच्या रेल्वे मार्गांशी विलीनीकरण होऊन, आजच्या स्वरूपातील 'पश्चिम रेल्वे' अस्तित्वात आली. सध्या पश्चिम रेल्वेच्या कार्यक्षेत्रात मुंबई सेंट्रल, वडोदरा, अहमदाबाद, राजकोट, भावनगर आणि रतलाम असे सहा विभाग येतात.

अनुलोमच्या वतीने जालन्यात तीनशे गरजू कुटुंबांची दिवाळी गोड

गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप; सामाजिक बांधिलकी जपत अनुलोमचा स्तुत्य उपक्रम



नवनाथ गव्हाणे / प्रतिनिधी

दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण प्रत्येक कुटुंबाला आनंदाने साजरा करता यावा, या सामाजिक भावनेतून अनुलोम संस्थेच्या वतीने जालना शहरात गरजू कुटुंबांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत सुमारे तीनशे गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप करून त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या किराणा किटमध्ये दिवाळी सणासाठी आवश्यक असलेल्या विविध किराणा साहित्याचा समावेश करण्यात आला होता. गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी आणि त्यांनाही सणाचा आनंद समाधानाने साजरा करता यावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. अनुलोमच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समाजातील गरजू घटकांपर्यंत सणाचा आनंद पोहोचविण्याच्या या प्रयत्नाचे उपस्थितांनी कौतुक केले. या प्रसंगी अनुलोम उपविभाग जनसेवक जालना श्याम रक्ताटे, भाग (पान ३ वर)

३३ वर्षांच्या शैक्षणिक सेवेनंतर निवृत्त; विद्यार्थीप्रिय शिक्षक आणि संस्कारांचा वारसा जपणारे व्यक्तिमत्त्व : आ संतोष पाटील दानवे



भोकरदन प्रतिनिधी : समृद्धी लॉन्स भोकरदन येथे आयोजित श्री छत्रपती संभाजी विद्यालय, तांदुळवाडीचे प्रा. संजय पैठणकर सरांच्या सेवानिवृत्ती सत्कार समारंभास आ संतोष पाटील दानवे यांनी

उपस्थित राहत त्यांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांचा सत्कार केला शिक्षक हे केवळ अक्षरांची ओळख करून देत नाहीत, तर विद्यार्थ्यांचे चरित्र आणि भविष्य घडवतात. प्राचार्य संजय पैठणकर सरांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात अत्यंत निष्ठेने, तळमळीने आणि प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे कार्य करून हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडवले आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे हे योगदान सदैव स्मरणात राहील.

पैठणकर सरांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या पुढील वाटचालीस उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि मनःशांती लाभो, हीच श्री राजुरेश्वराचरणी प्रार्थना करतो आणि मनःपूर्वक सदिच्छा देतो अशा भावना आ संतोष पाटील दानवे यांनी व्यक्त केल्या ते पुढे म्हणाले की, संजय पैठणकर यांनी आपली सेवा प्रामाणिकपणे आणि विश्वासाने केली. शिस्त आणि मायेचा अद्भुत संगम असलेले ते विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत, असे गौरवोद्गार आ संतोष पाटील दानवे यांनी काढले.

श्री छत्रपती संभाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तांदुळवाडी येथे तब्बल ३३ वर्षे ज्ञानदान, विद्यार्थ्यांमध्ये संस्कारांची जपणूक आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिल्यानंतर प्राचार्य संजय पैठणकर निवृत्त झाले.

तर माजी नगराध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी ही प्राचार्य संजय पैठणकर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा गौरव केला,तर सेवानिवृत्त मुंबई उच्च न्यायालयाचे सर न्यायधिश किशोर दादा सोनवने ,डॉ सुनिताताई पवार,डॉ योगेश इंगळे,राजेंद्र पैठणकर,सौ वैशाली ताई सिरसाट,सौ चारूशिला पैठणकर यांनी ही संजय पैठणकर सरांच्या कार्याचा गौरव करून पुढील वाटचालीस शुभेच्छांदिल्या. शिक्षण ही केवळ नोकरी नसून ते एक व्रत आहे, हे पैठणकर यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले. प्रदीर्घ सेवाकाळात ते दररोज वेळेपूर्वी शाळेत उपस्थित राहत. त्यांच्या शिस्तप्रिय कार्यपद्धतीचा प्रभाव विद्यार्थ्यांसोबत सहकारी शिक्षकांवरही पडला. त्यांच्या निवृत्तीमुळे तांदुळवाडी, मुठाड आणि जैनपूर-कोठारा परिसरातील शैक्षणिक क्षेत्रातील शिस्तप्रिय पर्व संपल्याची भावना यावेळेस व्यक्त करण्यात आली.

पैठणकर यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी डॉक्टर, अभियंते, पोलीस उपनिरीक्षक आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून देशाच्या विविध भागांत कार्यरत (पान ३ वर)

भाजपाच्या नगरसेविका सुलोचना गोर्डे यांच्यावतीने किराणा किटचे वाटप



प्रतिनिधी । जालना : यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक कुटुंबांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत गरजू कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी आणि त्यांच्या सणाचा आनंद द्विगुणित व्हावा, या सामाजिक भावनेतून भाजपा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेविका सुलोचना लक्ष्मण गोर्डे यांच्या वतीने प्रभाग क्रमांक १४ मधील जवळपास ३०० गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. या किराणा किटमध्ये साखर, तांदूळ, तूरदाळ, चणाडाळ, खाद्यतेल, पुडा, साबण, सोनपापडी, चहापत्ती, बिस्किटे चिवड्याचे पाकीट असा या किटमध्ये समावेश आहे.

प्रभागात कोणते गरजू कुटूंब आहे, या कुटूंबियांची निलेश गोर्डे मित्रमंडळाकडून नावे काढली. यानंतर या कुटूंबियांना या किट देण्यात आल्या. या उपक्रमासाठी भाजपाचे सदस्य निलेश गोर्डे, अभिजीत भवर, सौरभ भिसे, शिवाजी क्षीरसागर, अविनाश खंडागळे, श्रीराम ढगे, राहुल कोलते, शुभम गोर्डे, कार्तिक गवारे, योगेश शिंदे, अनिकेत पाटील, अभिजित बोहाते आदींनी विशेष परिश्रम घेतले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना या मदतीमुळे मोठा आधार मिळाला आहे. सणासुदीच्या काळात गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा या सामाजिक उपक्रमाचे प्रभागातील नागरिकांनी कौतूक केले आहे. ऐन दुष्काळात गरजूवंत कुटूंबियांना दिलेला आधार हा महत्वाचा आहे, असे अनेक कुटूंबियांनी बोलून दाखविले. सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर

पक्षातील वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली येत्या काळातही विविध सामाजिक उपक्रम राबविण्यावर आपला भर राहणार आहे. समाजातील गरजू आणि वंचित घटकांना शक्य तेवढी मदत करणे, त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना आधार देणे, हेच आपले ध्येय आहे. राजकीय कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत जनसेवेचे कार्य सातत्याने सुरू ठेवणार असल्याची माहिती भाजपाचे सक्रिय सदस्य निलेश गोर्डे यांनी दिली.

घरफोडीचा गुन्हा उघडकीस! ९ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत; आरोपी जेरबंद



जालना । प्रतिनिधी : जालना शहरातील जुन्या जालना परिसरात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा छडा लावण्यात कदीम जालना पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीला जेरबंद करून चोरीस गेलेला ९ हजार ३५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईमुळे घरफोडी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता फिर्यादी यांनी एमएसबी रोड, मियासाब दर्गा चौकाजवळील जुन्या जालना परिसरात असलेल्या कार डेकोरच्या दुकानात नेहमीप्रमाणे कामकाज केले. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दुकान बंद करून ते घरी गेले होते. मात्र, दि. २ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता दुकानाशेजारी राहणाऱ्या व्यक्तीने फोन करून दुकानाचे कुलूप तुटले असून शटर उघडे असल्याची माहिती दिली. त्यानंतर फिर्यादी व त्यांच्या मुलाने दुकानात जाऊन पाहणी केली असता दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. चोरट्यांनी दुकानातील रोख रक्कम तसेच ९ हजार ३५० रुपये किमतीचे ४०७६ मॉडेलचे स्पीकरचे १० वायर बंडल चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६४७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन तपास पथके तयार करण्यात आली. या पथकांनी घटनास्थळाची पाहणी, गोपनीय बातमीदारांची मदत आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान सद्दुरसिंग सुकुरसिंग राजपूत (वय ३५, रा. लोणी मोहल्ला, जालना) याच्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेला ९ हजार ३५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे. जालना शहरातील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी कदीम जालना पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेंगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोलीस कर्मचारी सचिन चौधरी, सदा राठोड, धनाजी कावळे, अकील पटेल, मतीन शेख, दिलीप गायकवाड व संदीप चव्हाण यांच्या पथकाने केली.

दिवाळीत ध्वनी व वायू प्रदूषणाच्या तक्रारींसाठी जिल्हा व तालुकास्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती नागरिकांना ११२ क्रमांकावरही करता येणार तक्रार



जालना : दिवाळी सणाच्या कालावधीत फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषण रोखण्यासाठी तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासाठी जालना जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष यंत्रणा कार्यान्वित केली आहे. यासाठी जिल्हा व पोलीस ठाणेनिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, नागरिकांना संबंधित अधिकाऱ्यांच्या मोबाइल क्रमांकावर, ई-मेलद्वारे तसेच ११२ क्रमांकावर तक्रार नोंदविता येणार आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ६ नोव्हेंबर रोजी धनत्रयोदशी, ८ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन, १० नोव्हेंबर रोजी दिपावली पाडवा, सण साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत फटाके फोडताना होणारे ध्वनी व वायू प्रदूषण, तसेच नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने ही व्यवस्था केली आहे. मुंबई उच्च न्यायालयात दाखल डगज MOTU PIL No. ०१/२०२६, दिनांक २३ सप्टेंबर २०२६ मधील निर्देशानुसार फटाक्यांच्या वापरामुळे होणाऱ्या प्रदूषणाच्या अनुषंगाने तक्रारी स्वीकारण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी जिल्हा व पोलीस ठाणेनिहाय नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार जालना जिल्हा पोलीस प्रशासनाने ही व्यवस्था केली आहे. याकरीता (पान ३ वर)

तृतीयपंथीय बांधवांसोबत दिवाळीचा आनंदोत्सव; गुरुचॅरिटेबल ट्रस्ट आश्रमात भेटवस्तूंचे वाटप

जालना : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, जालना तसेच राजाराम बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, वसुर आणि सहारा सामाजिक विकास संस्था, चांदई ठोंबरे, ता. भोकरदन, जि. जालना यांच्या संयुक्त विद्यमाने तृतीयपंथीय बांधवांच्या गुरु चॅरिटेबल ट्रस्ट या आश्रमात दिवाळी सणानिमित्त भेट देऊन तृतीयपंथीय बांधवांना भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. दिवाळी हा आनंद, उत्साह, प्रेम आणि सामाजिक एकोप्याचा सण आहे. समाजातील प्रत्येक घटकाला सणाचा आनंद घेता यावा तसेच तृतीयपंथीय बांधवांनाही समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने सहभागी होता यावे, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आश्रमातील तृतीयपंथीय बांधवांशी संवाद साधून त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि समाधान हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या उपक्रमाप्रसंगी सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयातील विशेष अधिकारी (शा.नि.शा) श्रीमती मोदाळे निलेश लक्कस, हरिदास भोपळे व गजानन गवळी. शिवदास कुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांनी तृतीयपंथीय बांधवांना भेटवस्तू देऊन त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. तृतीयपंथीय समाजाला सन्मान, समान संधी व सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत असून, अशा उपक्रमांमुळे समाजात आपुलकी, समता आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ होत आहे.

बावला पार्कमधील अतिक्रमणे हटवून मूलभूत सुविधा द्या! २२ वर्षांपासून सांडपाणी, दुर्गंधी आणि डासांच्या त्रासाने नागरिक हैराण; शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन



जालना, दि. ६(प्रतिनिधी)- शहरालगतच्या चंदनझिरा येथील प्रभाग क्रमांक १२ मधील बावला पार्क परिसरातील विविध नागरी समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले असून, या भागातील अतिक्रमणे हटवून सांडपाणी व्यवस्थापन, भूमिगत ड्रेनेज आणि पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन यांसह मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी परिसरातील नागरिकांना सोबत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकार्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, शहरप्रमुख दीपक रणनवरे, संदीप झारकंडे, अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख वसीम पठाण, शहरप्रमुख शेख फेरोज, अमित यादव, सकावत खॉन, रईस शेख, जावेद शेख, तुकाराम भुतेकर, अफसर शेख, सय्यद सलीम, शेख बाबा आदींची उपस्थिती होती. यावेळी निवेदनत म्हटले आहे की, बावला पार्क परिसरात मागील तब्बल २२ वर्षांपासून सांडपाण्याचा प्रश्न कायम आहे. परिसरात सांडपाणी साचत असल्याने डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून, नागरिकांना डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, नागरिकांना आरोग्याच्या समस्यांसह मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी, सांडपाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी भूमिगत ड्रेनेज व्यवस्था निर्माण करावी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी भूमिगत पाइपलाइन टाकण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय प्रभाग क्रमांक १२ मधील रस्त्यांवर तसेच रस्त्यांच्या कडेला करण्यात आलेली अतिक्रमणे हटवून नागरिकांच्या येण्या-जाण्यासाठी रस्ते मोकळे करावेत आणि रस्त्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. स्थानिक बेरोजगारांना रोजगाराची संधी द्या- जिल्हाप्रमुख श्रीवास्तव दरम्यान, जालना औद्योगिक वसाहतीमध्ये स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दाही निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. जालना शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या संख्येने सुशिक्षित बेरोजगार युवक आहेत. मात्र, औद्योगिक वसाहतीतील विविध उद्योगांमध्ये परप्रांतीय मजुरांना मोठ्या प्रमाणात काम दिले जात असल्याने स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधींपासून वंचित राहावे लागत असल्याची भावना जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांनी निवेदनात व्यक्त केली. स्थानिक युवकांना प्राधान्याने रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने संबंधित उद्योग व्यवस्थापनाला आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

ओबीसी, ईबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांसाठी पीएम यशस्वी शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाइन विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जालना,दि.६(जिमाका) : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'पीएम यशस्वी प्री-मॅट्रिक व पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती' योजनांची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनांसाठी विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (छ्ज्झ) तसेच महाडीबीटी २.० (चरहरउ्हढ २.०) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या ज्या मुला-मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत. पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या इयत्ता नववी व दहावीतील मुलींनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. तसेच इयत्ता पाचवी व आठवीतील मुलींचे शिष्यवृत्ती अर्जही पूर्वीप्रमाणे सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरता येतील. याशिवाय जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमधील व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, तसेच सैनिकी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता अशा योजनांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर पूर्ववत भरता येणार आहेत. पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज केवळ एनएसपी पोर्टलवर भरावेत. या योजनांसाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार नसल्याची सूचना देण्यात आली आहे. यामध्ये ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसह व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींच्या शिष्यवृत्तीचा समावेश आहे. महाडीबीटी पोर्टलवर पूर्ववत अर्ज करता येणाऱ्या योजनांमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक अभ्यासक्रम शिकणाऱ्या व्हीजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता, ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती, तसेच या तिन्ही प्रवर्गांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनांचा समावेश आहे. शासकीय तसेच खासगी आयटीआयमध्ये प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनाही व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ घेता येणार आहे. अर्ज व पडताळणीचे वेळापत्रक : एनएसपी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज प्रक्रिया १७ जुलै २०२६ पासून सुरू झाली असून, विद्यार्थ्यांना ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. त्रुटी असलेल्या अर्जांची पडताळणी तसेच संस्थास्तरावरील पडताळणी १५ डिसेंबर २०२६ पर्यंत, तर जिल्हा व संबंधित विभागीय स्तरावरील पडताळणी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करताना विद्यार्थ्यांनी संबंधित शाळा व महाविद्यालयांची नोंदणी एनएसपी पोर्टलवर झालेली असल्याची खात्री करावी. अन्यथा संबंधित शाळा किंवा महाविद्यालय अर्ज भरताना यादीत दिसणार नाही. त्यामुळे सर्व शाळा व महाविद्यालयांनी पोर्टलवर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे.